मूल्य १३०/-

मासिक शिक्षणातील आनंदासाठी..

| वर्ष नववे | अंक १०-११ | नोव्हेंबर-डिसेंबर २०१५ |

# जडण-घडण


(विद्यार्थी, शिक्षक, पालकांचे संयुक्त व्यासपीठ)

**डॉ. रघुनाथ माशेलकर**
मानद संपादक

**डॉ. सागर देशपांडे**
मुख्य संपादक





## दिवाळी विशेषांक २०१५



# वारसा उद्योगाचा


- डॉ. श्रीनिवास साठे, कल्याण

**श्री. भवरलाल जैन - जळगाव येथील जैन उद्योगसमूहाचे संस्थापक. जैन पाईप्स, शेती उत्पादने, सौर ऊर्जा ते प्रक्रिया उद्योगापर्यंत पसरलेला हा जैन उद्योग, त्यांनी आपल्या रक्ताचं पाणी करून त्याच्या सिंचनातून उभारला. या ओसवाल घराण्याकडे हा उद्योगाचा वारसा कसा आला? ही घराणी राजस्थानातून का स्थलांतरित झाली? त्यांची पाळेमुळे कोणती? उद्योगाचा वारसा त्यांनी कसा जपला? नोकरीऐवजी उद्योगाला हा समाज का प्राधान्य देतो? अशा अनेक गोष्टींची लेखकाने इथे सहजसुंदर मीमांसा केली आहे.**





भारताच्या प्राचीन, अर्वाचीन इतिहासात व्यापाराला अनन्यसाधारण महत्त्व होतं. खास करून पश्चिम किनाऱ्यावर हा व्यापार होताना दिसतो. देशाबाहेर समुद्रापार भूमीशी, राजसत्तांशी त्यांचा संबंध येत होता. इ. स. पूर्व २५०० ते इ. स. पूर्व ५०० या काळात इजिप्त, फोनेशिया आणि बाबिलोतशी व्यापारी संबंध घनिष्ठ होते. त्यातूनच पुढे इ. स. पूर्व २५० ते इ. स. २५० या काळात ग्रीक-पर्शियन यांच्या येथे वसाहतीही असण्याची शक्यता गृहीत धरली जाते. पुढे अरबस्तान, युरोपातील इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, चीन आदींशी ही व्यापार परंपरा वाढीस लागली. हा सर्व व्यापार पश्चिम किनाऱ्यावरून वा वायव्य सरहद्दीतून होताना दिसतो. अर्थात त्या भागातील म्हणजे केरळ, कर्नाटक, गुजराथ, मारवाड, सिंध-पंजाब आणि महाराष्ट्र प्रदेशाच्या समाजाशी व्यापारी संबंध येत होते. एवढ्या वर्षांची ही व्यापार परंपरा वरील पैकी किती जणांनी टिकवली, वाढवली हाही अभ्यासाचा विषय आहे. या दोन-तीन हजार वर्षांचा, त्या भागातील मानव वंशशास्त्राचा अभ्यास करताना इतिहास पाहता हे व्यापारी, उद्योगी 'वारसा' गुण आज जे आढळतात ते गुजराथी व मारवाडी समाजातच. फक्त त्याच्या खुणाच नाहीत तर त्या वारशाचे संवर्धन, भरभराट झालेली आहे.



'वारसा' या शब्दांचे अर्थ ऑक्सफर्ड/केंब्रिज किंवा भारतीय परंपरेत जे लावले जातात ते जास्त करून स्थावर/जंगम मालमत्तेचे, जसे Property that is or can be inherited किंवा something that is passed down from preceding generations किंवा माणसाला वंश परंपरेने मिळणारा सामाजिक, आर्थिक, बौद्धिक आणि राजकीय गुणवत्ता-दर्जा म्हणजे 'वारसा', ज्याला विरासतही म्हणतो. येथे वारसा उद्योगाचा, उद्यमशीलतेचा या संबंधाने विचार करणार आहोत. तेव्हा अन्य कला, शास्त्र, विद्या यांच्याविषयी न पाहता हिंदुस्थानातील उद्योगाच्या सामाजिक वारशाकडे वळू. त्यासाठी प्राचीन व्यापारी वृत्ती बाळगणारा समाज पाहण्यासाठी आपण आधुनिक समाजाकडून मागं गेलेलं योग्य ठरेल. आज पाय रोवून उभा असणाऱ्या आणि 'वारसा' बाळगणाऱ्यांची पूर्व परंपरा पाहू. ज्यामुळे प्राचीन ते अर्वाचीनचा प्रवास समोर येऊन त्या 'वारशा' मागची कारणं उलगडतील. या 'वारशाला' परिस्थिती, राजसत्ता किती, कशा आणि का कारणीभूत ठरल्या आहेत हे जसं समोर येतं तसंच त्या समाजाची अस्तित्वाची लढाई ही देखील प्रकर्षाने जाणवून त्यांच्या 'व्यापारीवृत्तीचा' अभिमान वाटायला काहीच हरकत नसावी !

### औद्योगिक क्रांतीनंतरचा व्यापार

युरोपातील औद्योगिकीकरणाचा, भारताच्या व्यापाराचा आणि तो करणाऱ्यांचा विचार करू. त्यापूर्वी भारतात उद्योग-व्यवसाय मोठ्या प्रमाणात होतेच. ज्याला कुटिरोद्योग म्हणता येईल असा तो खेडोपाडी रुजलेला. परंतु यांत्रिकीकरणानंतर सर्वच संदर्भ बदलत गेले. यंत्रावर जसं उत्पादन होऊ लागलं तसं मालाची उत्पादन क्षमता वाढली. माल वाहतूकही यंत्र साहाय्याने सुकर, जलद झाली. जुनी बारा बलुतेदारी, 'बार्टर पद्धत' मोडीत गेली. शेती माल आणि कच्च्या मालाची गरज वाढली. कुटिरोद्योगात पिढ्यान्‌पिढ्या स्थिरावलेला वारसा चालविणारा समाज कोलमडला. त्याच्या बेरोजगाराला पर्याय म्हणून तो शेतमजूर किंवा कामगार झाला. मुंबई सारख्या शहरांची भरभराट होत गेली. कापड गिरण्या, सूत गिरण्यांना प्रारंभ झाला. कच्च्या मालाची निर्यात आणि पक्क्या मालाची आयात हेच १९ व्या शतकातील भारतीय उपखंडातील उद्योगाचं चित्र होतं. तसं इंग्रजी सत्तेचं फार मोठे सहकार्य भारतीय उद्योग-उद्योजकांना मिळतही नव्हतं. त्या काळातील अगदी नाना शंकर शेट, कावसजी जहांगीर, जमशेटजी जीजीभाई, डेव्हिड ससून, करमदास मुळजी आदी जे उद्योग सुरू करणारे होते ते प्रथम किरकोळ व्यापार, ट्रेडिंग करणारे - दलाली करणारे होते. थॉमस टिमबर्गच्या शब्दात सांगायचं तर, 'Coordination of the Factors of Production' म्हणजेच कच्चा माल देणारे आणि पक्का माल विकणारे! या सर्वांनी जरी ठरवलं तरी तत्कालीन ब्रिटिश सत्ता त्यांना स्पर्धेत टिकू देणार नव्हतीच.


युरोपात, किंबहुना सर्व जगावर सत्ता राखणाऱ्या इंग्रजांची भूक ही मोठी होती. ती कच्च्या मालाची भूक भागवणारा आणि पक्का माल खपू शकणारा भारतीय उपखंडच त्यांचा त्राता ठरला. वर नमूद केलेला कोणीही उद्योजक हा व्यापाराचा 'वारसा' घेऊन आलेला नव्हता किंवा त्या समाजातील नव्हता. त्यामुळे इंग्रजांना या देवाण-घेवाणीसाठी असा समाज हवा होता, जो वर्षानुवर्षे पिढ्यान्‌पिढ्या हाच उद्योग करीत आलेला आहे, करण्यास उत्सुक असतो. भारताच्या इतिहासात आक्रमणांची परंपरा पाहिली तर ती पूर्व, उत्तर, दक्षिणेला नाही तर वायव्य सरहद्दीतून, खैबर खिंडीतून, सिंध-पंजाब आणि पुढे समुद्रमार्गे - पश्चिम किनाऱ्यावरून म्हणजेच मागे म्हटल्याप्रमाणे मारवाड, सिंध, गुजराथ हे भूप्रदेश आणि तेथील समाज हा रगडला जात होता. सुमारे दोन हजार वर्षे हा संघर्ष होताना दिसतो. या भूप्रदेशावर वसणाऱ्या ज्या दोन जाती वा समुदाय आहेत ते सिंधी-मारवाडी, गुजराथी होत. या शतकानुशतकांच्या आक्रमणांना कंटाळून त्यांनी 'क्षात्र' धर्म सोडून 'वैश्य' धर्म स्वीकारला यात आश्चर्य ते काय ? भारतीय उपखंडाचे परकीयांना वाटणारे आकर्षण हे अर्थातच व्यापार आणि येथील उत्पादन हेच होते. सोन्याचा 'धूर' निघणारी ही भूमी पहावीशी, हवीशी वाटणं स्वाभाविक आहे. त्याच ओढीने आलेला इंग्रज आणि दोनशे वर्षे येथे उद्योग-व्यापार पाहणाऱ्या या दोन जमातींकडे न वळता तरच नवल होतं. राजपुतांचा प्रसिद्ध अभ्यासक जेम्स टोड अशा १२८ व्यापारी जातींचा उल्लेख आपल्या पुस्तकात देतो. (सन १८००-१८२०). पुढे शंभर वर्षांनी १९२१ च्या जनगणनेत राजपुतानात ६,२७,000 बनियांची नोंद आहे. तरी बरं १८६० ते १९०० च्या कालावधीत लाखो लोकांनी राजस्थानातून स्थलांतर केलेलं किंवा दुष्काळात जीव गमावले होते. थोडक्यात हाच समाज इंग्रजांनी आपल्या हाताशी धरून, वेळी संरक्षण देऊन देशाच्या खेडोपाडी स्थिर केला आणि आपल्या उद्योग, राज्यव्यवस्थेची घडी पक्की केली हे सत्य आहे.

### मारवाडी समाजाचा पूर्व इतिहास

अतिप्राचीन, प्राचीन काळापासून मानव हा सतत भटकतच आलेला आहे. जेव्हा तो आपल्या सर्व गरजांची पूर्तता होते अशा विश्वासापर्यंत आला तसा स्थिर होत गेला. त्यातून त्याची संस्कृती, राष्ट्र, राज्य, गांव, नगर ही कल्पना वास्तवात आली. मानवाचा विकासही झाला. तरीही मानव कायमचा सदा-सर्वकाळ आपल्याच लोकसमूहात राहिला असे दिसत नाही. देशाटन करणं हा मानवाचा जणू काही धर्म आहे. अर्थात स्थलांतरणाची कारणं अनेक आहेत, असतात. सुमारे

तीन हजार वर्षांपूर्वी जेव्हा सरस्वती नदी लुप्त झाली तेव्हा पहिलं स्थलांतर झाल्याचं काही मानतात. दुसरे हूणांची आक्रमणे पाचव्या शतकात झाली त्या काळात राजस्थानींना - मारवाडी - ओसवालांना बाहेर पडणं गरजेचं ठरलं. तिसरे स्थलांतर १९ व्या शतकाच्या मध्यावर झालं. सततचे पडणारे दुष्काळ, राजकीय आश्रयाचा अभाव आणि नव्या रस्ते-रेल्वे सुधारणा - इंग्रजी सत्ताश्रय यातून झालेलं स्थलांतर. सन १८९० चा मारवाडचा अहवाल सांगतो सुमारे ८० लाख परिवार गत पन्नास वर्षात भारताच्या कानाकोपऱ्यात गेले. त्यात ओसवाल समाज हा मोठ्या संख्येने होता.

मागे म्हटल्याप्रमाणे मारवाडची भौगोलिक स्थिती त्यांना विस्थापित करण्यास भाग पाडत गेली. कधी आक्रमणं तर कधी निसर्गकोप. त्यातून हा सर्व परिसर वाळवंटी, रेताड त्यामुळे शेती दुर्मिळ. उपजीविकेसाठी अशा वेळी स्थलांतर वा व्यापार उद्योग करणं आलं. ओसवाल वंशाच्या उत्पत्तीच्या अनेक कथा सांगितल्या जातात. जोधपूर जवळील ओसिमा या ठिकाणी या जैन वंशाची स्थापना झाली म्हणून ते ओसवाल. त्यांची मूळ गोत्रे १८ होती. त्या सर्वांच्या सहगोत्रांची संख्या वाढत आज १४०० च्या वर आहे. या ओसवालांचं वैशिष्ट्य म्हणजे त्यात समाजातील अनेक जाती-उपजाती समाविष्ट आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय ते शुद्रांपर्यंत सर्वांना जैनी बनवून - ओसवाल महाजन म्हणून एका पातळीवर आणलं. आजही हिंदू धर्माचरण करणारेही ओलवाल आहेत तर जैनी-श्वेतांबरी स्थानकवासी आहेत. या ओसवालांचा विश्वसंचार स्तिमित करणाराच आहे.




**ओसवालांचा विश्वसंचार**

मध्ययुगातील सत्तेच्या माध्यमातून झालेला ओसवालांचा प्रवास हा जास्त रोमहर्षक आहे. भरभराटीचा हा त्यांचा कालखंड, रजपूत असूनही शस्त्रांशिवाय त्यांनी उत्तरेत राजसत्ता आपल्या अंकित ठेवल्या. तुघलकाच्या काळात सन १३५१ रोजी सीहा श्रीमाल हा टांकसाळ प्रमुख होता. तर १३७१ फिरोजशहा तुघलकचा तो प्रमुख होता. गुजर शहांची नाणी सर्वत्र चालत. खंबायत व भडोचचा व्यापार फक्त ओसवालच करीत. जेव्हा अकबराने १५७१ ला अहमदाबादचा ताबा घेतला तेव्हा त्याचा शांतिदासशी संबंध आला. अकबराने त्याला नगरशेट पदवी दिलेली. जोधाबाई त्याला भाऊ माने तर जहांगीर तर त्याला जोहरीमामा म्हणत असे. कस्तुरभाई लालभाई ही त्याच वंशातील दहावी पिढी.

औरंगजेबाच्या काळात सेठ माणकचंद दिल्ली दरबारात होता. पुढे तो बंगालात गेला, टांकसाळ काढली. त्याचेच नाणे तेव्हा बंगालात चालत होते. बादशहाला वेळोवेळी तो कर्जाऊ रक्कम देत होता. दिल्लीचे तख्त खिळखिळे झाल्यावर दिल्लीचे राज्य हे जगतशेट ओसवालच चालवीत. थोडक्यात सन १५२५ ते १७२५ या दोनशे वर्षात त्यांचे मोठ्या प्रमाणात व्यापारी स्थलांतर झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल मोहिमांचा अभ्यास केला. तेव्हा त्यांच्याही लक्षात आलं की या ओसवाल व्यापाऱ्यांच्या मदतीने मुघल मोहिमा साध्य करतात. पुढे पेशव्यांनी हे लक्षात घेऊन आपलं सर्व लक्ष मारवाड रजपूतांवर केंद्रित करून दिल्ली सत्ता खिळखिळी केली. ओसवालांच्या खुष्की मार्गाने प्राचीन व्यापाराच्या कहाण्या खूप रंजक आहेत. अगदी रोम-इजिप्त-रशिया पर्यंत त्यांचा संचार होता. वर्षानुवर्षे हा व्यापाराचा वारसा हा ओसवाल समाज सांभाळत आलेला आहे. जैन विचार-आचाराचा आधार त्याला मिळत गेला जो व्यापाराला पोषक होता आणि तोच ब्रिटिशांनाही रुचून त्यांनी याच ओसवालांना हाताशी धरून १९ व्या शतकात भारतात पाय रोवले. अशाच या उद्योगशील रजपूत-मारवाडवासी स्थलांतरित ओसवाल वारशाला समृद्ध करणाऱ्या चोरडिया गोत्री भवरलाल हिरालाल जैन यांचा उद्योग वारसा हा आदर्शवतच आहे !

**भवरलाल जैनांचा वारसा....**

भवरलाल जैन यांचं गोत्र 'अदित्यनाग' जे ओसवालांच्या मूळ अठरा गोत्रातील एक. त्या अदित्यनागचे सह गोत्र चोरडिया. हे घराणे जैन आडनाव लावत असले तरी त्यांचे



अन्य भाऊबंध चोरडियाच लावतात. इतर जैनांप्रमाणे हेही मूळचे क्षत्रिय रजपूतच होते. जैन धर्माची स्थापना जरी इ. स. पूर्व काळात झाली तरी पुढे त्याचा विस्तार होतच राहिला. निरनिराळ्या कालखंडात आणि परिस्थितीत लोकांनी या धर्माचरणाचा स्वीकार केलेला आढळतो. ओसवाल जातीचा जन्म वा जैन अंगिकार केला तो काळ इ.स. १३-१४ किंवा वि. सं. ७० मानला जातो. श्री. रत्नप्रभ सूरी यांनी ओसिया नगरीत तेथील जनतेला जैन धर्माची दिक्षा देऊन अनेकांना ओसवाल जात दिली. मूळ कर्मठ वा मर्यादित असेलली ही जात पुढे सर्वसमावेशक होत महाजन व्यापारी वृत्तीपर्यंत गेली. या उद्योग वारसा लेखाचे नायक पद्मश्री भवरलालजी यांच्या घराण्याचा, पूर्वजांचा इतिहास शोधताना २८ पिढ्या मागे जातो. संवत १२११ सन ११५४ ला या घराण्याचा मूळ पुरुष श्रीपालजी हे राठौड-रजपूत यांनी ओसवाल जैनचा स्वीकार केला. राजस्थानात वही भाटांच्या नोंदी समृद्ध आहेत. हजारो वर्षांचा सलग इतिहास त्या नोंदीतून उलगडतो. श्रीपालजी सन ११५४ ते श्री. भवरलालजी जन्म १९३७ पर्यंतच्या पिढ्यांचा सलग इतिहास मिळाला आहे. या वंशावळीत ८३३ वर्षात १६६ मुलगे, १२० मुली जन्माला आल्या. बाल मृत्यू अठरा आणि निपुत्रिकांची संख्या सत्तावीस आहे. हे चोरडिया आजही आपली मूळ गावं बिकानेर, अगोलाई, बगीयारो आणि बावल सांगून राठौड वाणी जैन स्वतःला मानतात. याचाच अर्थ मूळचे रजपूत परिस्थितीला कंटाळून झाले वाणी-ट्रेडिंगमध्ये गेले. स्पर्धा, उत्कर्ष आणि अस्तित्वासाठी ओसवाल जैन झाले. अशा या घराण्याचं वैशिष्ट्य म्हणजे श्री. भवरलालजींच्या मागे २८ पिढ्यात एकही दत्तक पिढी नाही. याचा अर्थ श्रीपालजींची अनुवंशिकता वा DNA ही आजही टिकून अबाधित आहे. त्याच प्रमाणे त्यांच्यातील रजपूत रक्त हेही तसंच शुद्ध असणार. ही गोष्ट एका सामान्य घराण्यात तीस पिढ्या आढळणं (Purity of Blood) हे देखील 'वारसा'ची असामान्यताच दाखवते ना ! म्हणूनच हा उद्योगाचा वारसा हा एकमेवाद्वितीय (युनिक) ठरतो.

**घराण्यातील मातृसती**

जगात सतीची चाल वा प्रथा ही पूर्वापार होती. परंतु मध्ययुगीन इतिहासात ती भारतात जास्त प्रभावी असणार. सतरा-अठराव्या शतकात तर ती अतिरेकाकडे गेली. राजस्थानातील जोहार आणि सती परंपरा जगजाहीरच आहे. रजपूत योध्दयांच्या स्त्रियांचं सती जाणं तत्कालीन परिस्थितीत अनिवार्य असावं. तसंच प्रेम आणि दैवीपणाचे आकर्षण हे देखील कारण होतं. पती मागे पत्नीने सहगमन करणं ही मूळ कल्पना. जी सर्वत्र आढळते. परंतु श्री. भवरलालजींच्या घराण्यात बावीसाव्या पिढीत हरनाथ याच्या मृत्यूनंतर त्याची आई रत्ना जात चोपडा संवत १८३३ (इ.स. १७७६) कोरणा गावातील तलावाकाठी सती गेली? हा शिलालेख आहे. सोबतच्या छायाचित्राप्रमाणे एक राजस्थानी वेष परिधान केलेली स्त्री कडेवर लहान मूल दाखवलं आहे. हा मातृसतीचा प्रकार अगदी विरळा आणि अभ्यासकांना नवा होता. जोधपूर परिसरात मी प्रवास केल्यावर मला साधारण अठरा मातृसतीच्या शिळा सापडल्या. पुढे आश्चर्य म्हणजे मुलामागे

आईच नाही तर नातवामागे आजी आणि पणतवामागे पणती सती गेल्याचंही आढळतं. हा हरनाथ वयाने मोठा - पाच मुलांचा बाप होता. लहान मुलगी तीन वर्षांची होती. कोरणा या ठाकूरांच्या गावात हे चोरडिया - जैन रहात होते. त्या गावावर पोखरण वासियांचे हल्ले होत. पशुधन ही मारवाडमधील मोठी संपत्ती मानली जात होती. गाई बैलांची खिल्लारे हे आजही तेथील वैशिष्ट्य आहे. चामड्या पासून दूधदुभत्या पर्यंतचा व्यापार प्रसिद्ध. त्यावेळी पशुधन पळवणं हा चोरांचा उद्योग. त्याचे पुरावे तेथील इतिहासात पानोपानी वाचायला मिळतात. अशाच एखाद्या लढाईत हरनाथचा बळी गेला आणि पुत्रप्रेमाने किंवा सतीपुण्यासाठी त्याची आई सती गेली.

हा सर्व इतिहास शोधताना या घराण्यातील रजपूत रक्ताचा वारसाही समोर आला. आपला व्यवसाय-उद्योग-व्यापार करताना जीव ओतून काम करण्याचं मूळ या आत्माहुतीत खरोखर असणार. या त्यागाने १७८० ला त्याच्या मुलाला मुथा पदवी कोरणा ठाकूरने दिली. मुथा म्हणजे जहागिरदारांच्या कामात मदत करण्यासाठी जे महाजन ओसवाल जातात त्यांना मुथा व्यवस्थापक म्हणत असत. आज त्या आडनावाची घराणी आहेत. पुढे वैद्यांना मदत करणारे वेदमुथा झाले. हे मुथापद १८३०-४० पर्यंत या घराण्यात होतं. सोबत आपला व्यवसायही सुरूच होता. ब्रिटिश सत्ता भारतावर पकड बसवत गेली तसे राजे, महाराजे, जहागीरदार, ठाकूर संपले. सोबत त्यांचे आश्रयदातेही बेकार झाले. पुन्हा संघर्ष-व्यापार उद्योगाचा आसरा घ्यावा लागणार अशात सहा सातशे वर्षांचा रजपूत वैश्य महाजन शेती वारसा टिकविण्याचा संघर्ष श्री. भवरलालजींच्या पणजोबांचा जवारमलजींचा सुरू झाला. तो पुढे सुमारे शे-सव्वाशे वर्ष सुरू होता.

**वारसा 'संघर्ष' ते 'संपन्नता' प्रवास**

जोधपुरच्या पश्चिमेला चाळीस किलोमीटरवर अगोलाई गाव आहे ते या जैन उद्योजकाचं मूळ गाव. राजस्थानमधील दुष्काळाबाबत मारवाडीत ज्या म्हणी वा ओव्या आहेत त्या लक्षात घेतल्या तर जनतेच्या जीवनाची परवड समोर येते. मारवाडी लोककथा सांगतात की तीन वर्षातून एकदा पाऊस आणि आठ वर्षातून एकदा दुष्काळ हा ठरलेलाच आहे. हे खरं आहे कारण सन १७९२ ते १९०० या कालावधीत १६ दुष्काळ मारवाडने अनुभवले होते. सन १८०८-१० चा दुष्काळ हा


## समर्थ रघुवीर सहकारी पतसंस्था लि., मुंबई

**Reg. No. BOM/WP/RSR/CR/1125 Dt. 16/12/87**

प्रधान कार्यालय - ११/८४६, कृष्ण सहारा निकेतन हौ. सो., जय महाराष्ट्र नगर, मागठाणे, बोरिवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.

**Email - samarth_pat@yahoo.com** फोन - २८८६१५२६

**संस्थेची ठळक वैशिष्ट्ये**

१. संस्थेच्या स्थापनेपासून सतत ऑडिट वर्ग 'अ' मिळवणारी पतसंस्था २. चेक क्लिअरिंग सुविधा सुरू.

**आमच्या विविध आकर्षक ठेव योजना**

| | | | |
|---|---|---|---|
| बचत ठेव | ५% | समर्थ रिकरिंग ठेव | १०.५० ते ११% |
| समर्थ संचय ठेव | ७% | मुदत ठेव | ११% |
| कायम ठेव | १०.५० ते ११% | कॉल डिपॉझिट | ७ ते ८% |
| दैनंदिन ठेव | ७% | बाल विकास ठेव | १०.५०% |
| दामदिडपट ठेव | ४८ महिने | दामदुप्पट ठेव | ८० महिने |

**आमच्या विविध कर्ज योजना**

वैयक्तिक कर्ज, वाहन तारण कर्ज, सोने तारण कर्ज व राष्ट्रीय रोखे तारण कर्ज


**पदाधिकारी**

**श्री. रघुनाथ बा. चव्हाण - B.Com - संस्थापक/चेअरमन**

**श्री. सुर्बाजी वा. गायकवाड** - S.S.C. (1965) - व्हा. चेअरमन **श्री. अरविंद गो. पटेल** - B.Com. - सेक्रेटरी

**श्री. सुनिल बा. चव्हाण** - B.com, L.L.B,, G.D.C. & A., D. C. M. मुख्य व्यवस्थापक




मुंबईवर कोसळलेला. कारण मारवाड गुजराथेतील विस्थापितांनी मुंबई भरून गेली. पुढे १८३३-३४ चा दुष्काळ हा सिरोहीपासून मेवाडपर्यंत जास्त तीव्र होत गेला. तर १८३७-३८ मध्ये तर तो अलाहाबाद दिल्ली ते जयपूरपर्यंत होता. सुमारे १ लाख १३ हजार चौरस मैलातील दोन कोटी ऐंशी लाख जनतेला त्याची झळ बसून लाखभर जनावरे नष्ट झाली. पुढे दर दोन वर्षांनी दुष्काळ मारवाडच्या नशिबी आलेला. त्याच्या सोबतीला येणारी रोगराई, महामारी जनतेच्या जीवावर उठलेली. १८५७ च्या उठावाच्या पुढे मागे तर मारवाडातील जनतेचे हाल कुत्रेही खात नसावा. धान्य रुपयाला सहा शेर झालं होतं. कॉलरा, मलेरिया याची लागण जयपूर-जोधपूर पर्यंत मोठी होती. मेवाडमध्ये प्रचंड उष्णतेने १८७८ मध्ये कहर केला होता. पन्नास टक्के जनावरं तडफडून मेलेली. याच कालावधीत बिर्ला, बजाज, गोयंका अशी २५-३० घराणी महाराष्ट्रात, बंगालात गेल्याचं आढळतं. बिर्ला, बजाजांच्या चरित्रातील अनुभव थरकाप उडवणारे आहेत. सन १८९९ चा प्रलयंकारी दुष्काळ हा मारवाडातील आजपर्यंतचा सर्वात प्रलयंकारी ठरला. गेल्या चार पाचशे वर्षात असे दोन-तीनच दुष्काळ झाले असावेत. पंधराव्या शतकातील दुर्गादेवीचा असाच होता. या दुष्काळाला 'छप्पन्याकाळ' म्हणतात. कारण ते विक्रम सवंत होतं, १९५६ (१८९८-९९). दुष्काळाची चाहूल लागताच लोक घरं दारं सोडून बाहेर पडली. दुष्काळा मागोमाग रोगराई, चोऱ्या, दरोडे सुरू झाले. अन्नपाण्याचा प्रचंड तुटवडा, गावेच्या गावे ओस पडली. झाड पाला, गवत, काटेकुटे खाऊन लोक जगत होते. मुलांचे हालही पाहवत नव्हते. मुलं पळवली जात होती. वेळी माणूस माणसाला खात होता. मला प्रत्यक्ष भेटीत लोकांनी जे दाखवलं ते शहारे आणणारं होतं. दुष्काळाच्या भीतीने लोक बाहेर पडताना मुलांची त्यांना अडगळ वाटे. प्रवासात भीती होतीच. परंतु पोटची पोरं. त्यांचं काय करावं? म्हातारे अर्ध्या वाटेतच जीव सोडत. काही स्वेच्छेने मागे रहात. अशावेळी लोकांनी मध्यरात्री लहान मुलांना घरात झोपवून त्यांच्या डोक्याशी पाणी अन्न ठेवून घरे बंद करून सोडलेली. आज इतक्या वर्षांनी अशी ओसाड घरे अगोलाई, कोरणा मारवाडात बंद ओसाड आढळतात. एखादं घर उघडलं तर त्या घरात मुलांचे सांगाडे आढळतात. शंभर वर्षांमागे एकेका गोत्राची पाच-पंचवीस कुटुंबे आढळायची. येथे औषधालाही नाही आढळत. जैनांनी अशाच दुष्काळाला कंटाळून आपले अगोलाईतील भरलं घर सोडून १८९४-९५ ला महाराष्ट्राची वाट धरली. येताना जवळ केवळ लोटा असावा. अंगावर फाटके पैरण, मुंडासे आणि पायात तसेच जोडे. परंतु जवळ होता आत्मविश्वास आणि श्रीपालजींचा उद्योगाचा वारसा, जो पुढे संघर्षात मार्ग दाखवू शकला.

**जैन उद्योगाचा प्रवास**

वर वर्णन केल्याप्रमाणे आजच्या जैन उद्योगाचे निर्माते पद्मश्री भवरलाल हिरालाल जैन यांचा पूर्व इतिहास आहे. पाच-सहाशे वर्षांच्या संघर्षमय वाळवंटी जीवनाचा अनुभव घेत हा परिवार महाराष्ट्रात आलेला. प्रथम अजंठ्याच्या पायथ्याशी, एका वडाळी गावच्या पाड्यावर मोलमजुरी करी. पाचसात जणांचं कुटुंब होतं. शेतात मजुरी करून गुजराण करताना उद्योगाची खंत होतीच. काही वर्षात स्थिरता मिळवून फुटकळ लेन देन सुरू झालं. काटकसर अंगात मुरल्याने चार पैसे जोडून विश्वास आला. भाऊंचे पणजोबा आणि त्यांचे भाऊ छोटमलजी हे १८७०-८० पासून त्या भागात येत होते. अगोलाई-कोरणाची तशी वीस-पंचवीस ओसवाल कुटुंबे सन १९०० पर्यंत वाकोद-जामनेर-जळगावात पोहचली होती. एकटा दुकटा कधीच स्थलांतर करीत नसतो. तांड्याने ते होत असते. म्हणूनच त्या वस्त्यांना तांडा म्हणत असत. हळूहळू आठवडे बाजारात माल विक्री खरेदी सुरू झाली. खेडोपाडी पिकणारी ज्वारी, बाजरी, कापूस, भूईमूग घ्यावा तो परिसरात नियमित होणाऱ्या बाजारात विकावा आणि वस्तीतून गरजेचा लागणारा माल विकत घेऊन विकावा हा सर्वसाधारण या ओसवालांचा प्राथमिक उद्योग.

काटकसरीचा हा नमुना पाहू. जवारमलजी १८६०-७० च्या दशकात अगोलाईच्या पंचक्रोशीत बांगड्या, कापड, मसाले अशा वस्तू टोपलीत घेऊन विकीत. सोबत रिकामी चवरी वा कासंडी असे त्यात घरोघरी तूप विकत येत. मारवाडात दूध दुभत्याला मागणी चांगली. पशू उत्पादन भरपूर होते. हे तूप जोधपूरात विकत. त्या तुपाच्या पैशातून अन्य गरजेच्या चिजा विकत घेत. त्याच बरोबर सोबत काडेपेटी ठेवत. नुकतीच आगपेटी बाजारात आलेली. पूर्वापार घरातून अग्निहोत्र असे. परंतु गोरगरिबांना असा विस्तव बाळगणंही श्रीमंती वाटे. मग जवारमलजी त्यांना या आगपेटीने त्यांची चूल पेटवून देत. काही वेळेस गरीब घरच्या बायका त्यांच्या येण्याची वाट पहात बसत. याच स्वार्थासोबत परमार्थही असू शकेल ? पण परोपकार व गरिबीचे अनुभव नक्कीच मनाची श्रीमंती वाढवतोच.

हाच तुपाचा उपक्रम वाकोदात १९०० ते १९५० पर्यंत हे कुटुंब करीत होते. वाकोद ते जळगाव ३५-४० किलोमीटरचे अंतर पायी चालत भवरलालजींचे वडील येत होते. तर काडेपेटीऐवजी भवरलालजींचे एक आजोबा न चुकता वाकोदच्या आठवडे बाजारात १९६० पर्यंत तेथील दुकानदाराला दिवसभर स्वहस्ते पाणी पाजीत होते. त्याच


# राजारामबापू सहकारी बँक लि., पेठ

ता. वाळवा, जि. सांगली

संस्थापक - **लोकनेते राजारामबापू पाटील** मार्गदर्शक - **मा. आ. जयंतराव पाटील**

**सांपत्तिक स्थिती व इतर माहिती (दि. ३०.९.२०१५ अखेर)**

| | | | |
|---|---|---|---|
| सभासद | ३५,७६३ | भाग भांडवल | ३९.६१ कोटी |
| ठेवी | ११७१.९८ कोटी | कर्जे | ८१८.९८ कोटी |
| एकूण व्यवसाय | १९९०.९६ कोटी | प्रति सेवक व्यवसाय | ५.५५ कोटी |
| निव्वळ एन. पी. ए. | 0% | सी. आर. ए. आर. | १३.५७% |
| एकूण शाखा | ४० | सेवक वर्ग | ३५९ |
| निव्वळ नफा (३१ मार्च २०१५) | ११.०० कोटी | | |

**ठळक वैशिष्ट्ये**

कोअर बँकिंग सेवा कार्यान्वित, ए. टी. एम. व एस. एम. एस. बँकिंग सुविधा, तत्पर व विनम्र सेवा, बँकेचे स्वतःचे प्रशिक्षण केंद्र, मॉडर्न बँकींग सुविधामध्ये रुपे डेबिट कार्ड सेवा, कार्यक्षेत्र - महाराष्ट्र राज्य, स्थापनेपासून सतत ऑडिट वर्ग 'अ', लॉकर्स सेवा उपलब्ध, पैसे त्वरित पाठवण्यासाठी R.T.G.S. प्रणाली कार्यरत

**प्रा. शामराव पाटील** चेअरमन | **जनार्दन पाटील** व्हा. चेअरमन | **आर. एस. जाखले** कार्यकारी संचालक

**संचालक मंडळ**

वेळी त्यांची मुले-नातवंडे ही तागडी लावून मालाची खरेदी-विक्री करतानाच्या आठवणी सांगणारेही आहेत. उन्हा-पावसात उघड्यावर भरणारा हा बाजार आज सुनियोजित ओट्यांचा, स्वच्छतागृहांचा आणि पाणपोयी दिव्याचा करून देण्यामध्ये भवरलाल जैनांची भावना/प्रेरणा ही होती - आहे. किंबहुना मोठे भाऊ हे जन्मापासून (१९३७) ते १९५५ पर्यंत शिकत असताना हेच पहात होते. पुढे सर्व परिवार शिक्षणाच्या गरजेतून १९५५-५६ ला जळगावात स्थिरावला. आर. आर. स्कूलमधून भाऊ १९५७ ला मॅट्रिक झाले आणि महाविद्यालयासाठी मोह-मायानगरी मुंबईत आले. १९५७ ते १९६२ सिडनॅम, पोद्दार, रुपारेल असं शिक्षण घेत बी. कॉम. एल. एल. बी. झाले. एकोणिसाव्या शतकात बिर्ला, खंण्डेलवाल, रुइया, गोयंका अशा मारवाड्यांना आकर्षिणारी व पुढे धनवान बनणारी नगरी त्यांनी मनसोक्त उघड्या डोळ्यांनी पाहिली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून विदर्भातील मामलेदारीचे नेमणूक पत्र घेऊन ते वाकोदात आनंदाने परतले होते. आई-गौराबाई समोर छाती फुगवून ते पत्र दाखवित होते. गेल्या ५०-६० वर्षांचा कंटकमय प्रवास संपणार होता. कोणत्याही मातेला मुलाकडून हेच स्वप्न अपेक्षित असते ना ? परंतु ही माता वेगळी होती. तिने ते पत्र पाहिले आणि भाकरी थापता थापता ते बाजूला टाकले होते. ती म्हणाली - ''बघ भवर या पत्राने तू खूप मोठा सरकारी नोकर होऊ शकतोस. परंतु आजूबाजूच्या माणसा-प्राण्यांना त्याचा काय फायदा ? नोकरी हा आपला वारसा नाही. धंदा ही आपली परंपरा. कष्ट-कष्ट आणि कष्ट हे आपलं जीवन. ज्यामुळे सामान्य माणूस, पशु-पक्षी आणि जमिनीची सेवा होईल असं काहीतरी कर.'' या शब्दाने कोणताही मुलगा आईवर रागावला असता. परंतु भवरलालजी न चिडता, न रागावता जळगावात आले होते. नोकरी का धंदा हे द्वंद्व मनात घेऊन! तो पर्यंत स्वर्गीय कांताबाईंशी विवाह झालेला. त्याही उच्चशिक्षित होत्याच. त्यांचे विचार-सल्ला घेणं क्रमप्राप्तच होतं. त्याचवेळी त्या गर्भवती होत्या. म्हणजे आईवडिलांच्या जोडीला स्वतःच्या कुटुंबाची आता जबाबदारी होती.

एका हातात महिना मिळणाऱ्या पगाराचा कागद तर दुसऱ्या हातात रिक्तता, कोणत्याही मिळकतीची शाश्वती नसणारी! काय उद्योग करावा हे मोठं प्रश्नचिन्ह होतं. उद्योगातील सहकारी, मित्र, ओसवाल आजूबाजूस वर्षानुवर्षे भाऊ पहात होते. लाखोंच्या उलाढाली आणि ऐट अनुभवत होते. दुसरीकडे दोन वेळची भ्रांत. वाकोद-जळगावातील १५-२० जणांचा एकत्र परिवार. तुटपुंज्या आवकेतून तो गाडा रेटत होते. एकच व्यक्ती चुलत सेवाव्रती दलूभाऊ मुंबईत प्रिमिअरमध्ये पगारी-इंजिनिअर होते. बाकी सर्व अनिश्चित अस्थिर. भवरलाल हाच सर्वांचा आशेचा किरण होता. नोकरीची शाश्वती घेऊन आलेला आणि गौराई म्हणते 'धंदा' कर, ज्याने अठराविश्वे दारिद्र्य पिढ्यान्‌पिढ्या दाखवलेले. अशा सर्व गोंधळात भाऊ जळगावात फिरताना त्यांना पै नूरचाचा भेटलेला. एस्सो रॉकेलचा विक्रेता. ज्याचा भाऊंवर जीवच नाही तर भाऊंमधील स्पार्क ओळखलेला. त्याने भाऊंना जानेवारी १९६३ ला रॉकेलची एजन्सी घेण्यास सांगितलं. भाऊंनी त्यांना त्यासाठी भांडवल किती विचारलं. नूरचाचा म्हणाले, ''फक्त सात हजार रुपये.'' भाऊ हबकून गेले. इतके पैसे कोठून आणायचे ? घरात तर असणं अशक्यच होतं. गेल्या ५०-६० वर्षात ते कधीच एक रकमी कोणी पाहिले नसतील हा विश्वास होता. खिन्नतेने ते घरी आले. गौराईने ओळखलं. तिला सर्व समजलं. त्या मातेने घरातील माजघरातून खड्ड्यात साठवून ठेवलेले सात हजार समोर करीत 'शुभास्ते पथानं:' यशस्वी भव म्हणत स्वाधीन केले.

**सात हजाराचे दहा हजार कोटी**

आपल्या आईची तीव्र इच्छा लक्षात घेऊन भवरलालजींनी जळगाव जिल्ह्यासाठीची रॉकेल एजन्सी घेतली आणि जैन उद्योगाला प्रारंभ केला. एकूण ओसवाल वैशिष्ट्यांच्या सर्व गुणांसह हा उद्योग वाढीस लागलेला. साधारण पुढील आठ ते दहा वर्षात रॉकेल ते सिमेंटपर्यंत चाळीसएक शेतीपयोगी वस्तूंच्या एजन्सीज् जैन उद्योगाकडे आलेल्या होत्या. त्यातून खानदेशातील खेडोपाडी शेतकऱ्यांपर्यंत या कुटुंबाचा संपर्क येत गेला. आईच्या विश्वासाला पात्र ठरत भवरलालजींचे नाव यशस्वी उद्योजकात घेतलं जाऊ लागलेलं. यशस्वी उद्योजक होण्यासाठी एक मजेशीर निरीक्षण मॅक्लेलँडचे आहे. तो म्हणतो, 'In the Indian context the requirements for a successful entrepreneural personality include autonomy and personal responsibility.' अशाच प्रकारचे धार्मिक आचरणासंबंधात उद्योजक व धर्म यावर मॅक्स वेबर आपले निरीक्षण अधोरेखित करताना म्हणतो, 'मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेले गुजराथी वा मारवाडी उद्योजक हे जैन वा वल्लभाचार्य पंथाला कमालीचे चिकटून आहेत. त्यांची विचारसरणी व सर्वसामान्य हिंदू तत्त्वप्रणालीकडील त्यांचे आग्रह हेच त्यांच्या यशस्वितेचं गमक आहे.' जैन उद्योजकांच्या संपत्तीबद्दल बोलताना तो सांगतो की त्यांच्या जवळ जमा झालेली संपत्ती ते भांडवली गुंतवणूक अशा प्रकारे वापरतात की ते धन उधळत नाहीत वा भाड्यात नाही घालवत. दुसरा गुण म्हणजे ते असा उद्योग करतील की ज्यात प्राणीमात्रांना वा वनस्पतीला क्षती पोहचणार नाही.' पुढे तो लिहितो "Their belief in honesty and right dealing with their fellow men gave them high reputation for

honesty." मॅक्स वेबरची ही मतं एकूण जैन उद्योगाला किती लागू पडतात हे त्या उद्योगाचं स्वरूप पाहिल्यावर लक्षात येतं. ही त्याची मते शतका पूर्वीची १९१०-१५ ची आहेत.

सुरुवातीच्या काळात भवरलालजी स्वतः सायकलवरून हत्ती छापाचे रॉकेलचे डबे गावात विकीत असत. तेथे त्यांचेजवळ टँकर आले होते, ट्रॅक्स आलेले. एकदा नेरीच्या पंपावर पेट्रोल भरताना एक विदेशी गाडी आलेली त्यावर लिहिले होते 'भविष्यात व्यापार हा पाण्याचा होऊ शकतो?' भवरलालजींनी ते वाचलं आणि त्यांचं विचारचक्र सुरू झालं. आजच्या अनुभवातून असं लक्षात येते की भाऊंना स्वप्न पडावं तसा भविष्यकाळ दिसतो. उदा. येथे काय चित्र साकारायचं आहे हे जैन हिल्सवर फिरणाऱ्याच्या सहज लक्षात येतं. त्याचप्रमाणे १९७२-७३ च्या दुष्काळाने जैन उद्योगाचं झालं. पाण्यासाठीच्या प्लॅस्टिक पाईप्सच्या उद्योगात (ट्रेडिंगमध्ये) ते शिरले. शेतकऱ्याचा हा जिव्हाळ्याचा विषय. शेत तेथे पाणी - पाणी तेथे पाईप हे सत्र सुरू झालं. शेतकऱ्यांच्या ओळखी वाढल्या. पपेनची ओळख झाली. पपई लागवड, लॅटेक्सचे संकलन आणि पपेन पावडर यांनी जैन उद्योग परदेशात गेले. टिमबर्गचा संशोधन प्रबंध याच विषयातील आहे. त्यांनी संशोधनात जैन ओसवाल १९७८ नंतर ट्रेडर्सचे मॅन्युफॅक्चर्स कसे, का झाले याचं सुंदर वर्णन दिलेलं आहे.

जगातील उद्योगात जैनांचा प्रवेश हा उत्साहवर्धक ठरला. साधारण १९८४ नंतर भागिदारीचे, प्रायव्हेट लिमिटेड, कॉर्पोरेट होणं अपरिहार्य ठरलं आणि १८९५ नोव्हें अगोलाईतून आलेला हा जैन परिवार १९९५ ला सहस्र हाताने उद्योग जगात विस्तारत गेलेला दिसतो. श्रावणातील कहाण्यांप्रमाणे उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही या उक्तीप्रमाणे आज २०१३-१४ पर्यंत उद्योगाच्या पन्नासाव्या वर्षी दहा हजार कोटीच्या उलाढालीत पोहचलेला. शेती आणि शेती उत्पादने, ठिबक सिंचन, फळ प्रक्रिया, सौर ऊर्जा, सौर पंप, दिवे, बायो एनर्जी, केळी, कांदा, आंबा उत्पादने असा प्रवास सुरू आहे. त्याच बरोबरीने स्वतःचे जैनीपण जपत शतकांचा उद्योग, सेवा आणि कुटुंबप्रेमाचा वारसा अखंड सुरू आहे. श्रीमान भवरलाल स्वतः ७८ वर्षांचे दोन बायपास, पेस मेकर बसवूनही आपल्या चार मुलांसोबत दोन नातवांच्या आधाराने जैनांचा १२५ जणांच्या परिवाराचे नेतृत्व करताना पाहिलं की या वारसा संस्कृतीपुढे नतमस्तकच व्हावं लागतं.

shreenivas.sathe@gmai,.com

